# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.
## प्रकटन

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे,अहमदनगर,सोलापूर .

विषय–जुलै–ऑगस्ट, 2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी ) व उच्च माध्यमिक (इ.12वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत (**Hall Ticket**)

संदर्भ–1.क्रमांक रा.मं./परीक्षा–7/2649/दिनांक : 02/07/2024.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्यांना कळविण्यात येते की, जुलै–ऑगस्ट 2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक (इ.12 वी) परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व माध्यमिक शाळांना /कनिष्ठ महाविद्यालयांना जुलै–ऑगस्ट, 2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक (इ.12 वी) प्रमाणपत्र परीक्षेची प्रवेशपत्रे (**Hall Ticket**)ऑनलाईन(**online**) पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर गुरूवार दिनांक. 04/07/2024 पासून **school /college login** मध्ये **download** करण्याकरीता उपलब्ध होतील. यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास माध्यमिक शाळांनी /कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे त्वरित संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (**Hall Ticket**) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

1. जुलै–ऑगस्ट,–2024 साठी सर्व माध्यमिक शाळांनी (इ.10 वी) व कनिष्ठ महाविद्यालयांनी (इ.12वी)परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
2. प्रवेशपत्र (**Hall Ticket**) ऑनलाईन (**online**) पध्दतीने प्रिंटिंग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा/प्राचार्यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.
3. प्रवेशपत्रामध्ये (**Hall Ticket**) विषय व माध्यम बदल असतील तर त्याच्या दुरूस्त्या माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात समक्ष येऊन तातडीने करून घ्यावयाच्या आहेत. त्या करीता प्रवेशपत्राच्या 02 प्रति सादर कराव्यात. तसेच केंद्रसंचालक यांनाही त्याची प्रत दयावी.
4. प्रवेशपत्रावरील (**Hall Ticket**) फोटो,स्वाक्षरी,विद्यार्थ्याचे नाव, जन्मतारीख व जन्मस्थळ यासंदर्भातील दुरूस्त्या माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करून त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरित पाठवावयाची आहे.
5. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबधित माध्यमिक शाळांनी /कनिष्ठ महाविद्यालयांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत (**Duplicate**) असा शेरा लिहून विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.
6. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे.
7. जुलै–ऑगस्ट, 2024 च्या परीक्षेच्या आवेदनपत्रामध्ये जन्मस्थळ दर्शविलेले नाही असे निदर्शनास आले आहे. त्या दुरूस्त्या तात्काळ करण्यात याव्यात.

जुलै–ऑगस्ट, 2024 मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक (इ.12वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त बाबींची नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

क्रमांक पुविमं/माध्यमिक /क/3547
पुणे –411005.
दिनांक : 03/07/2024.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–41005.

प्रत माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीसाठी
1.विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे.
2)शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हापरिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर

१५२ prakatan